श्री मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे

# कृषि विज्ञान केंद्र, दहिगांव-ने (अहमदनगर - II)

ता.शेवगांव,जि.अहमदनगर (महा.) पिन ४१४ ५०२

Email : kvkdahigaon@gmail.com Website : www.kvkdahigaon.org

✲ आम्हास फॉलो करा : kvk.dahigaon kvkahmednagar2 DahigaonKvk

कालावधी : जुलै ते सप्टेंबर २०२५ अंक क्र.२०२५/३

# ई न्युज लेटर

## तंत्रज्ञान तपासणी (OFT) -

**विषय : संकरीत जनावरांमध्ये बायपास स्निग्ध पदार्था चा वापर करून जनावरांची तब्बेत सुधारणे तसेच दुग्ध उत्पादन, दुधामधील स्निग्ध पदार्थ वाढवणे आणि जनावरांमधील लागवडीसाठी होणा-या समस्या कमी करणे .**

अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील शेतकर्यांचा दुग्धत्पादन हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो यामध्ये संकरीत जनावरांचा वापर केला जातो, परंतु संकरीत जनावरांमद्धे दुग्ध उत्पादन, दुधामधील स्निग्धता आणि जनावरांमधील लागवडीसाठी समस्या येत आहेत. त्यासाठी कृषि विज्ञान केंद्र, दहीगाँव ने अंतर्गत शेतकर्यांसाठी एक तंत्रज्ञान तपासणी बायपास स्निग्ध पदार्थाचा चा वापर करून जनावरांची तब्बेत सुधारणे तसेच दुग्ध उत्पादन, दुधामधील स्निग्धता वाढवणे आणि जनावरांमधील लागवडीसाठी होणा-या समस्या कमी करण्याचा प्रयत्न राहील .



**विषय : संकरीत जनावरांमध्ये लिंग विनिछित वीर्यमात्रेचा वापर करणे.**

अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील शेतकऱ्यांचा दुग्धोत्पादन हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो यामध्ये संकरीत जनावरांचा वापर केला जातो, परंतु संकरीत जनावरांमद्धे साध्या वीर्यकांडी चा वापर केल्या करणाने नर वासरे तसेच कालवडी जन्माला येतात. नर वासरे जन्माला आल्यावर ती सांभाळताना दूध उत्पादकाना समस्या येत आहेत. त्यासाठी कृषि विज्ञान केंद्र, दहीगाँव ने अंतर्गत शंकरवाडी येथील एकूण १० शेतकऱ्यांच्या प्रत्येकी १ गाय याप्रमाणे लिंग विनिछित वीर्यमात्रेच्या कांडी चा वापर करून फक्त कालवडी जन्माला घालण्याचे तंत्रज्ञान तपासणी चे काम हाती घेतले आहे. यासाठी लिंग विनिछित वीर्यमात्रेच्या कांडी ने कृत्रिम गर्भधारणा करून जातिवंत कालवड निर्मिती होऊ शकते आणि जनावरांमधील नर वासरे सांभाळण्यासाठीच्या होणार्या समस्या कमी करण्याचा प्रयत्न राहील .



## पथदर्शी प्रात्यक्षिक (FLD) -

**विषय : कागदी लिंबू पिकातील हस्त बहार व्यवस्थापणासाठी संजीवकाचा वापर.**

अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात लिंबू पिकाखालील क्षेत्रामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. लिंबू पिकातून मिळणाऱ्या शाश्वत उत्पन्नामुळे शेतकऱ्यांचा नविन लागवडीकडे कल वाढत आहे. उन्हाळ्यात लिंबाला

जास्त बाजारभाव मिळत असल्याने मृग बहाराऐवजी हस्त बहार धरणे शेतकर्यांसाठी आर्थिकदृष्ट्या फायदेशिर ठरते. उन्हाळ्यात अपेक्षित उत्पन्न मिळवण्यासाठी, हेक्टरी उत्पादकता वाढवण्यासाठी व उत्पादन खर्चामध्ये बचत करण्यासाठी टाकळीमानूर व परिसरातील शेतकऱ्यांसाठी कृषि विज्ञान केंद्र दहीगाव–ने च्या वतीने निवडक १० शेतकर्यांच्या शेतावर पथदर्शी प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले होते.



**विषय : केळी घडाची गुणवत्ता आणि उत्पन्न वाढविण्यासाठी पोटॅशियम डायहायड्रोजेन फॉस्फेट अधिक युरियाचा वापर.**

अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा व शेवगाव तालुक्यांमध्ये केळी पिकाखालील क्षेत्रामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. केळी पिकातून मिळणाऱ्या शाश्वत उत्पन्नामुळे या भागातील शेतकऱ्यांचा नविन लागवडीकडे कल वाढत आहे. नेवासा व शेवगाव तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी हे प्रमुख महत्वाचे पिक बनले आहे.

शेवगाव तालुक्यात केळीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्यामुळे दहिफळ येथे केळी उत्पादक शेतकऱ्यांसाठी स्फुरदाची कमतरता असणार्या जमिनीमध्ये केळी घडाची गुणवत्ता आणि उत्पन्न वाढविण्यासाठी पोटॅशियम डायहायड्रोजेन फॉस्फेट अधिक युरियाचा वापर हे पथदर्शी प्रात्यक्षिक राबविण्यात आले होते. यामध्ये घड पूर्ण निसवल्यावर केळ फुलं वेळीच कापावे, घडावर ८–९ फण्या ठेऊन बाकी खालच्या फण्या धारदार विळयाने सुरुवातीलाच कापून टाकाव्यात. केळीचा घड पूर्ण निसवल्यावर व केळ फुलं तोडल्यावर त्यावर १० लिटर पाण्यात ५० ग्रॅ . पोटॅशियम डायहायड्रोजेन फॉस्फेट अधिक १०० ग्रॅ . युरिया अधिक स्टिकर (१० मिली स्टिकर ) मिसळून फवारणीचे पथदर्शी प्रात्यक्षिक निवडक १० शेतकर्यांच्या शेतावर राबविण्यात आले.



**विषय : कापूस पिकातील किडीचे एकात्मिक व्यवस्थापन**

कापूस हे महत्त्वाचे नगदी पिक असून कोरड वाहू व बागायती क्षेत्रात या पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते.कापसी च्या एकूण क्षेत्रा पैकी जवळजवळ ९५ टक्के क्षेत्रावर बी.टी. वाणाची लागवड केली जाते . बदलत्या वातावरणाचा परिणाम किडी रोगांचा प्रदुर्भाव व अन्नद्रव्याचा असंतुलित वापर या मुळे पिकाची उत्पादकता मात्र कमी झाल्याचे दिसून येते .कीटक नाशकांचा असंतुलित वापर पिकात निर्माण होत असलेली प्रतिकार क्षमता, वातावरणाचे होत असलेले प्रदूषण या सारख्या घटकाचा विचार करून कृषि विज्ञान केंद्र, दहीगाव ने यांनी कोळगाव येथील १० निवडक शेतकऱ्यांच्या शेतावर ४ हेक्टर क्षेत्रावर कापूस पिकात एकात्मिक किडींचे व्यवस्थापन या विषयी पथदर्शी प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले, प्रात्यक्षिक राबवण्यासाठी आवश्क असलेले तंत्रज्ञान व निविष्ठा शेतकऱ्यांना देण्यात आल्या.




**विषय : तूर पिकातील वांझ रोगाचे व्यवस्थापन**

अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रमुख दल वर्गीय पिकातील तूर हे एक महत्वाचे पिक आहे. बदलत्या वातावरणामुळे व पिकातील रोगप्रतिकार क्षमता कमी झाल्याने तूर पिकात वांझ रोगाचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढत असल्याचे

निदर्शनात येत आहे. यालाच स्टरी लीटी मो झाईक देखील म्हटले जाते. हा रोग कोळी किडी द्वारे शेतात झपाट्याने पसरवला जातो. रोगाचा प्रादुर्भाव अति जास्त प्रमाणत झाल्यास पिकाचे ८० ते ९० टक्के पर्यंत देखील नुसकान होते.




**विषय : सी.एम.टी किट चा वापर करून संकरीत जनावरांमध्ये होणारा स्तनदाह रोखणे.**

अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील शेतकर्यांचा दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो यामध्ये प्रामुख्याने संकरीत जनावरांचा वापर केला जातो, परंतु संकरीत जनावरांमद्धे व्यवस्थापनाच्या अभावामुळे स्तनदाह होण्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे अपेक्षित दुग्ध उत्पादन मिळत नाही. तसेच बर्याचवेळा संकरीत गायी दूध देणे बंद होतात. त्यासाठी कृषि विज्ञान केंद्र, दहीगाँव ने अंतर्गत शेतकर्यांसाठी सी.एम.टी किट देण्यात आले. त्यामधून स्तनदाह होण्याच्या अगोदर लक्षात येते, व सध्या प्रतिजैवकांचा वापर करून स्तनदाह होण्यापासून रोखला जाऊ शकतो.



**विषय : डी.सी.ए.डी. खनिज मिश्रणाचा वापर करून संकरीत जनावरांमध्ये होणारा दुग्ध ज्वर रोखणे.**

अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील संकरीत जनावरांमध्ये आहार व्यवस्थापनाच्या अभावामुळे दुग्ध ज्वर होण्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे अपेक्षित दुग्ध उत्पादन मिळत नाही तसेच बर्याचवेळा संकरीत गायी दगावतात. त्यासाठी कृषि विज्ञान केंद्र, दहीगाँव ने अंतर्गत शेतकर्यांसाठी डी.सी.अ.डी खनिजांच्या मिश्रणाचे वाटप केले. गाभण संकरीत जनावराना दूधावरून दोन महीने आधी सोडून दिले जाते जेणेकरून त्यांची शरीराची झीज भरून निघेल, डी.सी.अ.डी खनिजांच्या मिश्रण आहार व्यवस्थापनामुळे गायी विल्या नंतर त्यांना दुग्ध ज्वर होन्याचा धोका कमी होतो.



**ग्रामीण युवकांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण :-**

**विषय : मुक्त संचार गोठा उत्पादन व्यवस्थापन**

या प्रशिक्षणा साठी २३ शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला, यामध्ये प्रशिक्षणार्थींना दुग्धव्यवसायात झपाट्याने होत असलेले बदल, व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे तसेच लसीकरण करणे काळाची गरज आहे, लम्पी स्कीन रोगाचे लसीकरनाद्वारे नियंत्रण करणे, जनावरांचे आरोग्य कसे सांभाळावे व चारा व खुराक किती प्रमाणात द्यावा याबाबत विषय विशेषज्ञ ( पशुधन उत्पादन ) यांनी मार्गदर्शन केले.

प्रशिक्षण कार्यक्रमानंतर प्रशिक्षणार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.



## शेतकरी प्रशिक्षण

### विषय : तूर आणि उडीद पिक उत्पादन तंत्रज्ञान

आदर्श कडधान्य गाव अंतर्गत तुर व उडीद समुह आद्यरेषा पिक प्रात्यक्षिक अंतर्गत कृषि विज्ञान केंद दहिगाव ने येथे दिनांक २१ जुलै २०२५ दरम्यान तुर आणि उडीद एकात्मिक पिक उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर कृषि विज्ञान केंद्र , दहिगाव ने येथे प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. कृषि विज्ञान केंद्र दहिगाव ने अंतर्गत आदर्श कडधान्य गाव तुर व उडीद पिकातील समूह आद्यरेषा प्रात्यक्षिकासाठी वरखेड ता. शेवगाव तसेच मोहज देवढे तालुका पाथर्डी येथील ७५० शेतकऱ्यांची निवड करण्यात आली असून सदर शेतकऱ्यांना तुर व उडीद पिकातील आधुनिक तंत्रज्ञान ची ओळख होण्याच्या दृष्टीने सदर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना कृषि विज्ञान केंद्राच्या वतीने समूह आद्यरेषा पिक प्रात्यक्षिक कशा पद्धतीने राबवायचे या विषयी सर्व माहिती देण्यात आली. तुर व उडीद पिकाचे एकात्मिक पद्धतीने व्यवस्थापन करत असतांना माती व पाणी परीक्षण, माती पाणी परीक्षणानुसार सेंद्रिय , जैविक आणि रासायनिक खतांचा वापर कसा करावा, रासायनिक तसेच जैविक पद्धतीने बिजप्रक्रिया, पेरणीसाठी योग्य अंतर, रुंद सरी वरंबा यंत्राचा तसेच टोकन यंत्राचा वापर कसा करावा, एकात्मिक पद्धतीने तणांचे नियंत्रण कसे करावे, पाणी व्यवस्थापन तसेच एकात्मिक किड व रोगांचे व्यवस्थापन कसे करावे या विषयी सविस्तर अशी माहिती देण्यात आली. यावेळी तुर व उडीद प्रात्यक्षिकात सहभागी शेतकऱ्यांना कृषि निविष्ठा जसे तुर व उडीद बियाणे , बिजप्रक्रियेसाठी जैविक निविष्ठा , दाणेदार सल्फर, ट्रायकोडर्मा, निंबोळी तेल, प्रोफेनोफोस, द्रवरूप स्वरूपातील सुक्ष्म अन्नद्रव्य देण्यात आले. यावेळी प्रशिक्षणास वरखेड तालुका शेवगाव मोहोज देवढे तालुका पाथर्डी येथील शेतकरी उपस्थित होते.




### विषय : लिंबू पिकातील हस्त बहार व्यवस्थापन तंत्रज्ञान

अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात लिंबू पिकाखालील क्षेत्रामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. लिंबू पिकातून मिळणाऱ्या शाश्वत उत्पन्नामुळे शेतकऱ्यांचा नविन लागवडीकडे कल वाढत आहे. भिलवडे व परिसरातील शेतकऱ्यांसाठी हे प्रमुख महत्वाचे पिक बनले आहे. त्यामुळे लिंबू उत्पादक शेतकऱ्यांची क्षमता वृद्धी करणे गरजचे आहे. उन्हाळ्यात लिंबाला जास्त बाजारभाव मिळत असल्याने मृग बहाराऐवजी हस्त बहार धरणे शेतकर्यांसाठी आर्थिकदृष्ट्या फायदेशिर ठरते. उन्हाळ्यात अपेक्षित उत्पन्न मिळवण्यासाठी, हेक्टरी उत्पादकता वाढवण्यासाठी व उत्पादन खर्चामध्ये बचत करण्यासाठी टाकळीमानूर व परिसरातील शेतकऱ्यांसाठी सहकार सक्षमीकरण मोहीम कार्यक्रमाच्या निमित्ताने दिनांक ३ जुलै २०२५ रोजी कृषि विज्ञान केंद्र दहीगाव–ने येथे लिंबू पिकातील हस्त बहार व्यवस्थापन तंत्रज्ञान या विषयावर कृषि विज्ञान केंद्र दहीगाव–ने च्या वतीने प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.



**विषय : परसबागेतील कुकुट पालन**

नेवासा, शेवगाव तालुक्यातील बर्याच प्रमाणात महिला शेतकरी शेतीला जोड धंदा म्हणून गावरण कुक्कुट पालन व्यवसाय करतात, शहरी भागामद्धे गावरण कोंबडीच्या अंडी तसेच मांस साठी चांगली मागणी आहे त्यासाठी ग्रामीण महिला शेतकर्यांनी कुकुट पालन प्रशिक्षणाची मागणी केली . त्यासाठी कृषि विज्ञान केंद्र, दहीगाँव ने यांच्या मार्फत कुकुट पालन विषयावर शेतकरी प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात गावरण कोंबडीचे लसीकरण ते ब्रूडिंग व्यवस्थापन तसेच कोंबड्यांचे आजार यावर चर्चा झाली. हे प्रशिक्षण २५ ऑगस्ट २०२५ या रोजी पूर्ण झाले. या प्रशिक्षणात ४४ महिला शेतकर्यांनी सहभाग नोंदवला



**विषय : हवामान बदल व शेती**

कृषी विज्ञान केंद्र दहिगाव ने वतीने एक दिवसीय हवामान बदल व शेती या विषयावर प्रशिक्षण वर्गाचे आयोजन दिनांक १६ जुलै २०२५ रोजी करण्यात आले. हवामान बदलाचे शेती क्षेत्रावर मोठे विपरीत परिणाम होत आहेत, या परिणामास सामोरे जाण्यासाठी शेतकऱ्यांनी तयार असणे गरजचे आहे. यावेळी पिकांमध्ये तयार होणारा जैविक व अजैविक ताण, या अनुषंगाने पिक पद्धती मध्ये करावयाचे बदल, विविध किडी व रोगांचा प्रादुर्भाव, त्यावरील उपाययोजना, प्रतिकूल परिस्थितीमध्ये करावयाचे अन्नद्रव्यांचे निजोयन, आपत्कालीन पिक नियोजन इ. विषयांवर यावेळी मार्गदर्शन करून चर्चा करण्यात आली. केव्हीके दहिगाव–ने येथे आयोजित या प्रशिक्षण वर्गात एकूण २० शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.



**विषय : समूह शेती, शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना**

कृषि विज्ञान केंद्राचे वतीने केव्हीके येथे भावी निमगाव येथील शेतकरी गटासाठी समूह शेती, शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना तसेच शेतमाल विपणन कौशल्ये या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन दिनांक ५ ऑगस्ट २०२५ रोजी करण्यात आले होते यामध्ये गटाच्या १८ शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये समूह शेतीची फायदे, कार्यपद्धती तसेच नव्याने कंपनी स्थापना करण्यासंबंधी मुलभूत व त्यासंबंधीच्या मार्गदर्शक सूचना, संचालक व प्रवर्तकांची निवड, कंपनी स्थापनेचे फायदे व संधी याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. तसेच किफायतशीर शेतीच्या दृष्टीने शेतमाल विक्री कौशल्ये याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



**विषय : संत्रा पिकातील बहार व्यवस्थापन तंत्रज्ञान**

अहिल्यानगर जिल्ह्यातील नगर तालुक्यात संत्रा पिकाखालील क्षेत्रामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. संत्रा पिकातून मिळणाऱ्या शाश्वत उत्पन्नामुळे शेतकऱ्यांचा

नविन लागवडीकडे कल वाढत आहे. वांजोळी व परिसरातील शेतकऱ्यांसाठी हे प्रमुख महत्वाचे पिक बनले आहे. त्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची क्षमता वृद्धी करणे गरजचे आहे. बहार व्यवस्थापन तंत्रज्ञानाद्वारे एकाच वेळी फुलधारणा व फळ धारणा होत असल्यामुळे शेतकर्यांसाठी आर्थिकदृष्ट्या फायदेशिर ठरते. अपेक्षित उत्पन्न मिळवण्यासाठी, हेक्टरी उत्पादकता वाढवण्यासाठी व उत्पादन खर्चामध्ये बचत करण्यासाठी वाळकी व परिसरातील शेतकऱ्यांसाठी दिनांक १९ सप्टेंबर २०२५ रोजी वांजोळी येथे संत्रा पिकातील बहार व्यवस्थापन तंत्रज्ञान या विषयावर कृषि विज्ञान केंद्र दहीगाव–ने च्या वतीने प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमामध्ये ६२ शेतकर्यांनी सहभाग नोंदवला.



**विषय : शेतकऱ्यांसाठी ग्रामीण वित्तीय सुविधा व सेवा.**

कृषि विज्ञान केंद्राचे माध्यमातून मौजे वरखेड ता. शेवगाव येथे ग्रामीण वित्तीय सुविधा, सेवा व योजनांबद्दल जनजागृती व्हावी या अनुषंगाने प्रशिक्षणवर्गाचे दिनांक २९ जुलै २०२५ रोजी आयोजीत करण्यात आले होते. शेती क्षेत्रासमोर ज्या विविध अडचणी व समस्या आहेत त्यामध्ये भांडवली खर्चात वाढ व शेती खर्चिक झाल्याने वित्तीय सुविधा, सेवा व योजनांबद्दल शेतकऱ्यांना माहिती होणे आवश्यक आहे. विविध कार्यकारी सेवा सो., सहकारी बँक, राष्ट्रीयकृत बँक, मायक्रो फायनान्स इ. बद्दल उपस्थित शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली. या प्रशिक्षण वर्गात एकूण ३२ शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.



## विस्तार उपक्रम

**शेती दिन :**

**विषय : आदर्श कडधान्य गाव अंतर्गत समुह आद्य रेषा उडीद पिक प्रात्यक्षिक.**

भारत सरकार आदर्श कडधान्य गाव अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र दहिगाव–ने यांचे मार्फत वरखेड ता. शेवगाव येथे खरीप हंगाम २०२५–२६ मध्ये उडीद पिकाचे एकात्मिक पिक उत्पादन तंत्रज्ञान विषयी शेती दिनाचे आयोजन दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी करण्यात आले. कृषि विज्ञान केंद्र दहिगाव ने अंतर्गत उडीद पिक समूह आद्यरेषा प्रात्यक्षिकामध्ये उडीद बियाणे ए.के.यु. १०–१, दाणेदार सल्फर, निंबोळी तेल , किटकनाशक, जीवामृत आणि द्रवरूप सुक्ष्म अन्नद्रव्य चा पुरवठा शेतकऱ्यांना करण्यात आला आहे. सदर उडीद प्रात्यक्षिकाची माहिती गावातील इतर शेतकऱ्यांना व्हावी तसेच उडीद पिकाचे एकात्मिक पद्धतीने व्यवस्थापन करता यावे यासाठी शेती दिनाचे आयोजन विषयी सविस्तर अशी माहिती देण्यात आली.



**विषय : समूह आद्यरेषा तेलबिया प्रात्याक्षिका अंतर्गत सोयाबीन शेती दिनाचे आयोजन :**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र दहिगाव–ने यांचे मार्फत पाचेगाव , बेल पिंपळगाव आणि घोगरगाव ता. नेवासा येथे खरीप हंगाम २०२५–२६ मध्ये सोयाबीन पिकाचे एकात्मिक सोयाबीन पिक उत्पादन तंत्रज्ञान विषयी शेती दिनाचे आयोजन दिनांक २६ व २७ सप्टेंबर २०२५ रोजी करण्यात आले.कृषि विज्ञान केंद्र दहिगाव ने अंतर्गत सोयाबीन पिक समूह आद्यरेषा प्रात्यक्षिकामध्ये सोयाबीन बियाणे फुले किमया आणि फुले दुर्वा, दाणेदार सल्फर, किटकनाशक, आणि द्रवरूप सुक्ष्म अन्नद्रव्य चा पुरवठा शेतकऱ्यांना करण्यात आला आहे.सदर सोयाबीन प्रात्यक्षिकाची माहिती गावातील इतर शेतकऱ्यांना व्हावी तसेच सोयाबीन पिकाचे एकात्मिक पद्धतीने व्यवस्थापन करता यावे यासाठी शेती दिनाचे आयोजन दिनांक २६ व २७ सप्टेंबर २०२५ रोजी हनुमान मंदिर , पाचेगाव व श्री. रमेश शिंदे वस्ती , बेल पिंपळगाव ता. नेवासा येथे करण्यात आले होते. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना माती व पाणी परीक्षण, माती पाणी परीक्षणानुसार सेंद्रिय , जैविक आणि रासायनिक खतांचा वापर कसा करावा, रासायनिक तसेच जैविक पद्धतीने बिजप्रक्रिया, पेरणीसाठी योग्य अंतर, रुंद सरी वरंबा यंत्राचा तसेच टोकन यंत्राचा वापर कसा करावा, एकात्मिक पद्धतीने तणांचे नियंत्रण कसे करावे, पाणी व्यवस्थापन तसेच एकात्मिक किड व रोगांचे व्यवस्थापन कसे करावे या विषयी सविस्तर अशी माहिती देण्यात आली.





**किसान गोष्टी**

**विषय : खरीप कांदा पिकातील सुधारित लागवड पध्दती**

कांदा पिकाचे क्षेत्रामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. क्षेत्रामध्ये वाढ होत असली तरी खरीप कांद्याची हेक्टरी उत्पादकता खूप कमी आहे. हेक्टरी उत्पादकता वाढवण्यासाठी व उत्पादन खर्चामध्ये बचत करण्यासाठी पोखर्डी व परिसरातील शेतकर्यांसाठी दिनांक २६ जुलै २०२५ रोजी पोखर्डी येथे खरीप कांदा पिकातील सुधारित लागवड पद्धती या विषयावर कृषि विज्ञान केंद्र दहीगाव–ने व तालुका कृषि अधिकारी अहिल्यानगर यांचे संयुक्त विद्यमाने किसान गोष्टी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर किसान गोष्टी कार्यक्रमामध्ये ५३ शेतकर्यांनी सहभाग नोंदवला.



**प्रधानमंत्री किसान सन्मान निधी कार्यक्रम :**

दिनांक २ ऑगस्ट २०२५ रोजी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत २० व्या हप्त्याचे वितरण देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी यांच्या शुभहस्ते थेट देशभरातील  शेतकऱ्यांच्या खात्यात रु. २०५०० करोड इतकी रक्कम वर्ग करण्यात आले. यावेळी पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांनी  दूरदृश्यप्रणाली द्वारे वाराणसी, उत्तर प्रदेश येथून थेट शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कृषी विज्ञान केंद्र दहिगाव येथे आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी डॉ. क्षितीज घुले पाटील हे होते, यामध्ये एकूण २०७ शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला. यावेळी उपस्थित शेतकर्यांना डॉ. एस.एस.कौशिक यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ऊस शेती याबद्दल मार्गदर्शन केले. तालुका कृषि अधिकारी, शेवगाव श्री. अंकुश जोगदंड, तालुका कृषि अधिकारी, पाथर्डी श्री महादेव लोंढे यांनी कृषि विभागाच्या योजनांबद्दल माहिती दिली.



**केव्हीके शेती कट्टा :**

कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून  सामुहिक प्रयत्न करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने कोळगाव ता. शेवगाव या गावाची निवड केलेली आहे. या गावांमध्ये दिनांक २८ जुलै २०२५, व दिनांक १९ ऑगस्ट २०२५ रोजी केव्हीके शेती कट्टा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना प्रमुख खरीप पिके जसे कपाशी, तुर, उडीद पिक संरक्षण व खतांचे नियोजन, कीटकनाशके फवारतांना घ्यायची काळजी, रब्बी हंगामातील विविध प्रात्याक्षिकांसाठी लाभार्थी निवड बद्दल मार्गदर्शन करण्यात आले.  कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ व विषय विशेषज्ञ (पिक संरक्षण ), विषय विशेषज्ञ (कृषि विद्या), विषय विशेषज्ञ (कृषि अभियांत्रिकी), विषय विशेषज्ञ (कृषि विस्तार), प्रक्षेत्र व्यवस्थापक, कार्यक्रम सहायक (मृदा चाचणी) यांनी सहभा ग घेऊन मार्गदर्शन केले. यामध्ये एकूण ६८ शेतकरी सहभागी झाले.





**लाळ्या खुरकुत लसीकरण शिबीर**

पाथर्डी तालुक्यातील शेतकर्यांकडून जनावरांमद्धे लाळ खूरकुद लसीकरण न केल्या कारणाने बर्याच वेळा लाळ्या खुरकुत ची लागण होते. त्यामुळे दूध उत्पादकाना बर्याच वेळी जनावरे दगावणे किवा उपचार करण्यात समस्या येत आहेत. व या रोगाचा प्रसार अतिशय जलद

असल्या कारणाने खूप मोठा परिसरातील जनावरे बाधित होतात त्यासाठी कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव ने अंतर्गत शंकरवाडी येथे दिनांक ३० सप्टेंबर २०२५ रोजी शेतकर्यांसाठी लाळ्या खुरकुत लसीकरण शिबीर हाती घेतले आहे. यासाठी शेतकर्याच्या गोठ्यावरती जाऊन लसीकरण केले गेले.






# कृषि विज्ञान केंद्र, दहिगांव-ने (अहमदनगर ||)

**डॉ.एस.एस.कौशिक (प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ) कृ.वि.कें.दहिगाव-ने,ता.शेवगांव**

यांनी दहिगाव-ने येथे प्रसिध्द केले आहे.

Email : kvkdahigaon@gmail.com, Website : www.kvkdahigaon.org



**मुख्य संपादक : डॉ.एस.एस.कौशिक (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख)**

सह संपादक : श्री.सचिन बडधे (विषय विशेषज्ञ,कृषि विस्तार)

-: संपादक मंडळ :-

श्री.माणिक लाखे (विषय विशेषज्ञ,पीक संरक्षक)

श्री.नारायण निबे (विषय विशेषज्ञ,कृषि विद्या)

श्री.नंदकिशोर दहातोंडे (विषय विशेषज्ञ,उद्यानविद्या)

इंजि.राहुल पाटील (विषय विशेषज्ञ,कृषि अभियांत्रिकी)

डॉ.चंद्रशेखर गवळी (विषय विशेषज्ञ,पशुविज्ञान)

श्री.प्रकाश बहिरट (प्रयोगशाळा तंत्रज्ञ,मृद परिक्षण)

श्री.प्रकाश हिंगे (प्रक्षेत्र व्यवस्थापन)

श्री.वैभव नगरकर (कार्यक्रम सहाय्यक,संगणक)